विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्तीबाबतचे सुधारित निकष निश्चित करण्याबाबत.....

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः विकाअ १११५/प्र.क्र.८८/५,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: ३१ डिसेंबर, २०१५.

वाचा :-

१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. विकाअ-२००७/४४०/प्र.क्र.१७४/२००७/५, दिनांक २५.७.२००७.
२) शासन पूरक पत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. विकाअ-२००७/४४०/प्र.क्र.१७४/२००७/५, दिनांक २८.८.२००७.
३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. विकाअ-२००७/मुमं-६८/प्र.क्र.२०७/०७/५, दिनांक २८.९.२००७.
४) शासन शुद्धीपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. विकाअ- २००७/प्र.क्र.३८९/५, दिनांक १५.१.२००८.
५) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. विकाअ-२००७/प्र.क्र.३८९/५, दिनांक ७.३.२००८ .
६) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. विकाअ-२००७/९५४/प्र.क्र.३६६/०७/५, दिनांक २४.३.२००८.
७) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. विकाअ-२००८/प्र.क्र.२७६/५, दिनांक २४.७.२००८.
८) शासन शुध्दीपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. विकाअ-२००७/प्र.क्र.३८९/५, दिनांक १.८.२००८.
९) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. विकाअ-२००८/प्र.क्र.३०३-अ/५, दिनांक ८.८.२००८.
१०) शासन पत्र, सामान्य प्रशासन विभाग, क्र. विकाअ-२००८/७३७/प्र.क्र.३०८/५, दिनांक २१.८.२००८.
११) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. न्यायप्र-२००९/प्र.क्र.१७४/५, दिनांक २२.४.२००९.
१२) शासन पूरकपत्र, सामान्य प्रशासन विभाग, क्र. विकाअ-२००९/प्र.क्र.२३१/५, दिनांक २६.५.२००९.
१३) शासन शुध्दीपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. विकाअ-२००९/प्र.क्र.२७६/५, दिनांक २४.७.२००९.
१४) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. विकाअ-२०१०/प्र.क्र.९८/ ५, दिनांक ३.९.२०१०.
१५) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. विकाअ-२०१०/१५५०/प्र.क्र.४८७/५, दिनांक ३१.१.२०११.
१६) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. संकीर्ण-२०११/१०५४/प्र.क्र.३५१/५, दिनांक २७.३.२०१२.

१७) शासन पत्र, सामान्य प्रशासन विभाग, क्र. विकाअ-२०१२/प्र.क्र.२३६/१२/५, दिनांक २८.८.२०१२.
१८) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. न्यायप्र-२०१२/प्र.क्र.२५४/५, दिनांक ६.६.२०१३
१९) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. विकाअ-२०१३/प्र.क्र.२३६/५, दिनांक १७.८.२०१३.
२०) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. विकाअ-१११३/प्र.क्र.२७९/५, दिनांक ६.१२.२०१३.
२१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. विकाअ-१११३/१२०/प्र.क्र.२७१/५, दिनांक १०.१२.२०१३.
२२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. विकाअ-१११३/प्र.क्र.३४७/५, दिनांक ४.३.२०१४.

**शासन निर्णय :-**

राज्यातील विशेष कार्यकारी अधिकाऱ्यांच्या नियुक्त्यांबाबतच्या तरतुदींमध्ये सुधारणा करणारे अनेक शासन निर्णय/परिपत्रके वेळोवेळी निर्गमित करण्यात आली. या सर्व शासन निर्णय/शासन परिपत्रकांमधील तरतुदी, सामायिक स्वरुपात निर्गमित करण्याची बाब विचाराधीन होती. त्याचबरोबर अनावश्यक तरतुदी वगळण्याची व नवीन तरतुदी अंतर्भूत करण्याची बाबही विचाराधीन होती. या पार्श्वभूमीवर सुधारित सामायिक शासन निर्णय खालील तरतुदींसह निर्गमित करण्यात येत आहे :-

२. <u>विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्तीसाठी निकषः-</u>

२.१ संबंधित व्यक्तीचे वय विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्त करावयाच्या कॅलेंडर वर्षाच्या १ जानेवारी रोजी २५ वर्षांपेक्षा कमी नसावे व ६५ वर्षांपेक्षा अधिक नसावे.

२.२ संबंधित व्यक्ती "किमान दहावी (एस.एस.सी.) किंवा तत्सम परीक्षा" किंवा "जुनी एस.एस.सी. (११वी) परीक्षा" उत्तीर्ण असावी.

२.३ संबंधित व्यक्तीचे महाराष्ट्रातील सलग वास्तव्य, त्याची विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती करावयाच्या कॅलेंडर वर्षाच्या १ जानेवारीच्या लगतपूर्वी किमान १५ वर्षे असावे.

२.४ संबंधित व्यक्तीला फौजदारी गुन्हयाखाली शिक्षा झालेली नसावी किंवा त्याच्याविरुध्द गंभीर स्वरुपाचा गुन्हा नोंदविलेला नसावा किंवा कोणत्याही न्यायालयाने त्यास नादार (bankrupt) जाहीर केलेले नसावे. मात्र सामाजिक चळवळींसंदर्भात दाखल झालेल्या सौम्य गुन्हयांसाठी अर्जदारास अपात्र ठरवू नये.

२.५ कोणतीही व्यक्ती विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून पुनर्नियुक्तीस पात्र असेल. मात्र निकषांच्या पूर्ततेसाठी त्याची पुनर्पडताळणी होणे आवश्यक राहील.

३. परिच्छेद ४.१, ४.२ व ६.१ ला अनुलक्षून विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून केलेली नियुक्ती जिल्हाधिकारी यांनी काढलेल्या नियुक्तीच्या आदेशापासून ५ वर्षांसाठी असेल. विहित कालावधीनंतर ती आपोआप संपुष्टात येईल. नियुक्तीच्या कालावधीत कोणतीही बेकायदेशीर कृती केल्यास किंवा त्याचेविरुध्द गंभीर गुन्हयाची नोंद आढळल्यास किंवा शिक्षा झाल्यास किंवा त्यास नादार म्हणून जाहीर केले असल्यास किंवा कोणत्याही कारणाशिवाय सुध्दा, कोणतीही पूर्वसूचना न देता अशी नियुक्ती, मुदतपूर्व रद्द करण्याचे अधिकार शासनास/जिल्हाधिकारी यांस असतील.

४. विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्तीसंदर्भात कार्यपध्दती :-

४.१ विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यासाठी मा.पालक मंत्री व मा.संपर्क मंत्री (नियुक्ती झाली असल्यास) यांच्याकडून प्राप्त झालेल्या नावांच्या यादीतील व्यक्तींकडून सोबतच्या **परिशिष्ट “१”** प्रमाणे विहित नमुन्यात जिल्हाधिकाऱ्यांनी माहिती भरुन घ्यावी व जे उमेदवार विशेष कार्यकारी अधिकाऱ्यांच्या नियुक्तीसाठी असलेल्या निकषांची पूर्तता करीत असतील, त्यांचे विहित नमुन्यातील अर्ज जिल्हाधिकारी यांनी पूर्वचारित्र्य पडताळणीसाठी संबंधित पोलीस अधीक्षक/पोलीस आयुक्त यांच्याकडे पाठवावेत. पोलीसांकडून पडताळणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्या सर्व उमेदवारांच्या नावांची यादी शासनाच्या मान्यतेसाठी सादर करावी. यादीच्या प्रत्येक पानावर संबंधित जिल्हाधिकारी यांची स्वाक्षरी असावी.

४.२ विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्तीस इच्छुक असलेल्या व्यक्तींचे अर्ज जिल्हाधिकाऱ्यांकडे प्राप्त झाल्यास जिल्हाधिकाऱ्यांनी संबधित मा.पालक मंत्री व मा.संपर्क मंत्री (नियुक्ती झाली असल्यास) यांचेकडे शिफारशीसाठी सदर अर्ज पाठवावेत व त्यांची शिफारस प्राप्त झाल्यावर उक्त परिच्छेद ४.१ प्रमाणे कार्यवाही करावी.

४.३ जिल्हाधिकारी यांनी वरीलप्रमाणे यादी शासन मान्यतेसाठी सादर करतांना प्रत्येक अर्जदाराच्या नावासमोर, नियुक्तीच्या निकषांनुसार तो पात्र/अपात्र असल्याबाबत स्पष्ट शिफारस करावी.

४.४ वरील परिच्छेद ४.१ व ४.२ च्या अनुषंगाने शासन मान्यतेनंतर केलेल्या नियुक्त्या, जिल्हाधिकारी यांनी असाधारण राजपत्रात प्रसिध्द कराव्यात.

४.५ ओळखपत्र **(परिशिष्ट "२" प्रमाणे),** प्रमाणपत्र **(परिशिष्ट "३" प्रमाणे),** सूचनापत्र **(परिशिष्ट "४" प्रमाणे),** रबरी शिक्के **(परिशिष्ट "५" प्रमाणे)** इ.साहित्य शासकीय मुद्रणालयाकडून प्राप्त करुन ते संबंधित व्यक्तींना वितरीत करण्याची व्यवस्था जिल्हाधिकारी यांनी करावी.

## ५. विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून पदसिध्द नियुक्ती :-

५.१ महाराष्ट्रातील कार्यरत विधान मंडळ सदस्य (विधान सभा सदस्य / विधान परिषद सदस्य) तसेच संसद सदस्य ( लोकसभा सदस्य / राज्यसभा सदस्य ) यांच्या विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्तीचे आदेश परस्पर जिल्हाधिकारी काढतील.

५.२ निवडणुकांमधून निर्वाचित झालेले महानगरपालिकांचे/नगरपालिकांचे महापौर व नगरसेवक, नगरपरिषदांचे/नगरपंचायतीचे अध्यक्ष व नगरसेवक, जिल्हा परिषदांचे अध्यक्ष व सदस्य, पंचायत समित्यांचे सभापती व सदस्य यांची विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून पदसिध्द नियुक्ती करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना असतील. यामध्ये महानगरपालिका/नगरपालिका/नगरपरिषदा/ नगरपंचायती यांमधील स्वीकृत/ नामनिर्देशित नगरसेवक तसेच जिल्हा परिषद व पंचायत समितीचे नामनिर्देशित सदस्य यांचा समावेश असेल. कोणतीही पदसिध्द नियुक्ती ५ वर्षांकरिता अथवा पुढील आदेशांपर्यन्त अथवा सदर व्यक्ती त्या पदावर असेपर्यन्त यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यन्त अस्तित्वात राहील. राज्य शासनास/ जिल्हाधिकारी यांना विशेष कार्यकारी अधिकारी यांची नियुक्ती वरील कालावधी पूर्ण होण्यापूर्वी केव्हाही, कोणतीही कारणे न देता संपुष्टात आणण्याचा अधिकार राहील.

ज्या पदामुळे (नगरसेवक/जिल्हा परिषद सदस्य/पंचायत समिती सदस्य इ.) विशेष कार्यकारी अधिकारी पदावर पदसिध्द नियुक्ती करण्यात आली होती, ते पद संपुष्टात आल्यास, पदसिध्द विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून केलेली नियुक्ती आपोआप रद्द होईल.

५.३ जिल्हयातील माजी विधान मंडळ सदस्य (विधान सभा सदस्य/विधान परिषद सदस्य) तसेच माजी संसद सदस्य (लोकसभा सदस्य/राज्यसभा सदस्य) हे विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्तीसाठी इच्छुक असतील तर त्यांचे इच्छुकतेबाबतचे पत्र प्राप्त झाल्यावर नियुक्तीचे आदेश जिल्हाधिकारी परस्पर काढतील. पात्रतेच्या अटींचा जोपर्यंत भंग होत नाही तोपर्यन्त तथापि त्यांच्या वयाच्या ७० वर्षांपर्यंत त्यांची नियुक्ती चालू राहील. माजी विधान मंडळ सदस्य/संसद सदस्य यांनी त्यांच्या इच्छुकतेबाबतचे पत्र **(परिशिष्ट "६" प्रमाणे),** संबंधित जिल्हाधिकारी यांचेकडे प्रत्येक ५ वर्षांनी सादर करणे आवश्यक आहे.

## ६. पुरस्कार प्राप्त व्यक्तींची विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती:-

६.१ “गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार”, “अण्णाभाऊ साठे पुरस्कार” व “दलित मित्र पुरस्कार” या पुरस्कारांची घोषणा झाल्यावर, त्या पुरस्कार प्राप्त व्यक्तींपैकी, ज्या व्यक्ती वरील परिच्छेद २ मध्ये नमूद केलेले निकष पूर्ण करीत असतील, अशाच व्यक्तींची जिल्हाधिकारी यांनी विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती परस्पर करावी.

६.२ अशा पुरस्कार प्राप्त व्यक्तींची विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती झाल्यानंतर त्यांच्याविरुध्द गुन्हयाची नोंद आढळल्यास अथवा परिच्छेद २.४ मधील नमूद परिस्थिती उद्भवली/झाली असल्यास त्यांची विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून झालेली नियुक्ती रद्द करण्याची कार्यवाही देखील जिल्हाधिकारी परस्पर करतील.

६.३ कोणत्याही न्यायालयाने त्यास शिक्षा दिल्याचे निष्पन्न झाल्यास त्याची विशेष कार्यकारी अधिकारी पदावरील नियुक्ती जिल्हाधिकाऱ्यांकडून तात्काळ रद्द करण्यात येईल व तो पुनर्नियुक्तीस पात्र ठरणार नाही.

६.४ ज्या व्यक्तींना २००८ पूर्वी “गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार” देण्यात आला आहे, अशा व्यक्तींनाही विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती देण्यात यावी.

६.५ “गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार”, “अण्णाभाऊ साठे पुरस्कार” व “दलित मित्र पुरस्कार” या पुरस्कार प्राप्त व्यक्तींची विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून केलेली नियुक्ती ही त्यांच्या वयाच्या ७० वर्षापर्यंत चालू राहील व वयाच्या ७० वर्षानंतर त्यांना अनर्ह ठरविण्यात यावे.

## ७. विशेष कार्यकारी अधिकारी यांचे अधिकार :-

विशेष कार्यकारी अधिकारी हे केवळ “साक्षांकनाचे” काम करतील. मूळ कागदपत्रे प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय त्यांनी साक्षांकन करु नये. तसेच परिशिष्ट “५” मधील रबरी शिक्क्यासह मूळ कागदपत्रांच्या छायांकित प्रतींवर न चुकता दिनांकासहीत साक्षांकन करावे. मूळ कागदपत्रांपेक्षा वेगळी माहिती नमूद असलेल्या कागदपत्रांवर विशेष कार्यकारी अधिकारी यांनी साक्षांकन करू नये. वेगळी माहिती असलेल्या कागदपत्रांवर जर “सत्य प्रत” म्हणून साक्षांकन केल्यास त्यामुळे होणाऱ्या सर्व प्रकारच्या परिणामांकरिता “विशेष कार्यकारी अधिकारी” म्हणून साक्षांकन करणारी व्यक्ती जबाबदार राहील. अशी घटना उघडकीस आल्यास त्या व्यक्तीची विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून करण्यात आलेली नियुक्ती रद्द करण्यात येईल व तो/ती विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून पुनर्नियुक्तीस अपात्र असेल.

## ८. प्रत्येक जिल्हयासाठी विशेष कार्यकारी अधिकारी नियुक्तीचे प्रमाण:-

८.१ प्रत्येक १००० नागरिकांमागे एका व्यक्तीची विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात यावी. सुलभ संदर्भासाठी प्रत्येक जिल्हयाची लोकसंख्या व त्यानुसार विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती करावयाची मर्यादा याची माहिती सोबतच्या **परिशिष्ट "७"** मध्ये देण्यात आली आहे.

८.२ प्रत्येक जिल्हयामध्ये विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्तीच्या एकूण प्रमाणकामध्ये किमान ३०% इतके प्रतिनिधीत्व महिलांसाठी असावे.

८.३ लोकसंख्येनुसार जिल्हानिहाय विशेष कार्यकारी अधिकाऱ्यांची संख्या १००० नागरिकांमागे १ विशेष कार्यकारी अधिकारी अशी विहित करताना, तालुकानिहाय लोकसंख्येच्या प्रमाणात प्रत्येक तालुक्यासाठी न्यायोचित प्रमाणात प्रतिनिधीत्व देण्यात येईल, याकडे संबंधित जिल्हाधिकारी यांनी लक्ष दयावे.

९. <u>सर्वसाधारण :-</u>

९.१ विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून केलेली नियुक्ती "मानसेवी" असल्यामुळे विशेष कार्यकारी अधिकाऱ्याला कोणतेही मानधन अथवा वेतन/भत्ते अनुज्ञेय असणार नाहीत.

९.२ महाविद्यालयाचे प्राचार्य व शाळेचे मुख्याध्यापक वगळता, कोणत्याही शासकीय/ निमशासकीय/बँक/महामंडळ/स्वराज्य संस्था इ. आस्थापनांमधील अधिकारी/कर्मचारी यांची विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येणार नाही.

९.३ विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्तीसाठी समाजातील सर्व स्तरातील घटकांना समन्यायी संधी देण्यात यावी.

९.४ विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्त झालेल्या व्यक्तीने घरावर, दुकानावर, कार्यालयावर स्वत:च्या नावासह "विशेष कार्यकारी अधिकारी" असा फलक लावावा. त्यांच्या नियुक्तीचा कालावधी संपुष्टात आल्यावर लागलीच त्यांनी सदर फलक काढावेत. तथापि त्यांनी त्यांच्या कुठल्याही वाहनावर "विशेष कार्यकारी अधिकारी" असा उल्लेख करू नये.

९.५ **"ओळख परेड" तसेच "मृत्यूपूर्व जबानी" यासाठी विशेष कार्यकारी अधिकाऱ्यांनी उपस्थित राहू नये.**

९.६ **"उत्पन्नाचे प्रमाणपत्र" देण्याचे अधिकार विशेष कार्यकारी अधिकाऱ्यांना नसतील.**

९.७ नियुक्तीचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर विशेष कार्यकारी अधिकाऱ्याने साक्षांकनाचे काम करु नये व सर्व साहित्य जिल्हाधिकारी यांचेकडे तात्काळ परत करावे. अन्यथा अशी व्यक्ती विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून पुनर्नियुक्तीसाठी अपात्र ठरेल.

९.८ नियुक्तीचा कालावधी संपल्यानंतर विशेष कार्यकारी अधिकाऱ्याने साक्षांकन केल्याचे निष्पन्न झाल्यास त्याचेविरुध्द जिल्हाधिकारी यांनी फसवणुकीचा गुन्हा नोंदवावा.

९.९ वरील परिच्छेद ४.४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे विशेष कार्यकारी अधिकारी यांच्या नेमणुकीचे आदेश असाधारण राजपत्रात प्रसिध्द केल्यानंतर, जिल्हाधिकारी यांनी सदर राजपत्र जिल्हयाच्या संकेतस्थळावर ठेवावे. तसेच विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून केलेली नियुक्ती विहित कालावधीपूर्वी संपुष्टात आल्यास ते आदेश देखील असाधारण राजपत्रात प्रसिध्द करुन ते जिल्हयाच्या संकेतस्थळावर ठेवण्यात यावेत.

९.१० तसेच जिल्ह्याचा इष्टांक, त्यानुसार केलेल्या नियुक्त्या व करावयाच्या नियुक्त्या यांचा तपशील शासनाच्या राज्य माहिती संचयिकेवर (State data Bank) दरमहा ५ तारखेपूर्वी स्थायी आदेशानुसार भरण्याची, तसेच तो अद्ययावत करण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी कार्यालयातील निवासी उप जिल्हाधिकारी यांची राहील. तसेच ही माहिती जिल्हयाच्या संकेतस्थळावर देखील ठेवण्यात यावी व वेळोवेळी अद्ययावत करण्यात यावी.

९.११ एकाच कुटुंबातील एकापेक्षा अधिक व्यक्तींची विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येऊ नये. याकरिता अर्जदार/अर्जदाराचा जोडीदार व अविवाहित मुलगा/मुलगी अशी कुटुंबाची व्याख्या समजण्यात यावी.

९.१२ लोकसंख्येनुसार निश्चित करावयाच्या इष्टांकामध्ये पदसिध्द म्हणून केलेल्या नियुक्त्या तसेच पुरस्कार प्राप्त विशेष कार्यकारी अधिकारी यांच्या नियुक्त्यांचा समावेश असणार नाही.

९.१३ ओळखपत्र, प्रमाणपत्र व रबरी शिक्के तयार करण्यापूर्वी विशेष कार्यकारी अधिकाऱ्यांची नावे जिल्हाधिकारी यांनी असाधारण राजपत्रात प्रसिध्द करावीत व त्याकरिता सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी प्रत्येक विशेष कार्यकारी अधिकाऱ्यास पुढीलप्रमाणे एकमात्र/अव्दितीय (unique) क्रमांक द्यावा :-

कॅलेंडर वर्ष/परिशिष्ट "७" नुसार जिल्हा क्रमांक/आधारकार्ड क्रमांक/वर्षनिहाय अनुक्रमांक

उदा. (वर्ष)/(जिल्हा क्र.)/(आधारकार्ड क्र.)/(वर्षनिहाय अ.क्र.)

२०१५/१/१२५७६८३०३६५९/१ ----------

२०१५/१/०२६४३१९६५२८६/२ ----------

२०१५/१/३७५२८०६१७४२१/३ ----------

वरीलप्रमाणे दिलेल्या क्रमांकास "नोंदणी क्रमांक (Registration No.)" असे संबोधून, त्याचा उल्लेख, ओळखपत्र व प्रमाणपत्र यामध्ये जिल्हाधिकारी यांनी करावा व त्यानंतरच ओळखपत्र व प्रमाणपत्र विशेष कार्यकारी अधिकारी यांना द्यावे. असा एकमात्र/अव्दितीय (unique) क्रमांक/नोंदणी क्रमांक हा ओळखपत्र व प्रमाणपत्र यावर नोंदवूनच ते विशेष कार्यकारी अधिकाऱ्यास देण्यात यावे.

९.१४ ओळखपत्र, प्रमाणपत्र, रबरी शिक्के यांमध्ये नमूद करावयाचा वैधतेचा कालावधी हा विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून, नावे असाधारण राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ५ वर्षे इतका राहील.

## १०. <u>राज्य शासनाच्या सेवेतून निवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांना साक्षांकन करण्याचा अधिकार :-</u>

१०.१ **अटी व शर्ती** -:

(अ) संबंधित गट "अ" व गट"ब" (राजपत्रित) अधिकारी नियत वयोमानानुसार निवृत्त झालेला असो अथवा स्वेच्छानिवृत्त झालेला असो, तो निवृत्ती वेतनधारक असावा.

(ब) निवृत्त झालेल्या गट "अ" व गट ब"(राजपत्रित) अधिकाऱ्याविरुध्द तो शासकीय सेवेत असताना त्याच्याविरुध्द फौजदारी किंवा विभागीय चौकशीची कार्यवाही किंवा निलंबनाची कार्यवाही प्रलंबित असल्यास असा सेवानिवृत्त अधिकारी, विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्तीसाठी अपात्र असेल.

(क) वयाच्या ७० वर्षापर्यंतच्या कालावधीसाठी तो विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून काम करण्यास पात्र असेल.

१०.२ **कार्यपध्दती :-**

१०.२.१ निवृत्तीपासून एका वर्षाच्या आत करावयाच्या अर्जासंदर्भात :-

(अ) सेवानिवृत्त अधिकारी विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्तीसाठी इच्छुक असल्यास त्याने निवृत्तीच्या दिनांकापासून एका वर्षाच्या आत विभाग प्रमुखाकडे थेट अर्ज करावा (अर्जाचा नमुना **परिशिष्ट "८"** प्रमाणे).

(ब) असा अर्ज प्राप्त झाल्यानंतर, सदर अधिकाऱ्याच्या सेवा कालावधीत, त्याच्याविरुध्द फौजदारी कार्यवाही किंवा विभागीय चौकशी करण्यात आली होती काय किंवा त्यास निलंबित केले होते काय, हे विभाग प्रमुखाने तपासावे. जर सदर अधिकाऱ्याविरुध्द त्याच्या सेवा कालावधीत अशापैकी कोणतीही कार्यवाही करण्यात आली असल्यास व अशा कार्यवाहीअंती तो दोषी ठरला असल्यास, विभाग प्रमुखाने अशा अधिकाऱ्याची विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्याकडे शिफारस करु नये. तथापि अशा कुठल्याही कार्यवाहीअंती तो पूर्णपणे दोषमुक्त असल्याचे सिध्द झालेले असल्यास विभाग प्रमुखाने अशा अधिकाऱ्याची विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्याकडे शिफारस करण्यास हरकत नाही (शिफारस पत्राचा नमुना **परिशिष्ट "९"** प्रमाणे).

(क) ज्या अधिकाऱ्याविरुध्द त्याच्या सेवा कालावधीत कोणतीही फौजदारी किंवा विभागीय कार्यवाही किंवा निलंबनाची कार्यवाही करण्यात आली नसेल, तर विभाग प्रमुखाने त्याच्या नावाची शिफारस जिल्हाधिकारी यांचेकडे करावी.

(ड) विभाग प्रमुखाकडून शिफारस प्राप्त झाल्यानंतर जिल्हाधिकारी यांनी संबंधित अधिकाऱ्याची विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्याचे आदेश काढावेत.

(इ) अशी नियुक्ती ही आदेशाच्या दिनांकापासून ५ वर्षांसाठी असेल. मात्र विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून केलेल्या नियुक्तीच्या कालावधीत सदर अधिकाऱ्याविरुध्द फौजदारी गुन्हा नोंदविण्यात आल्यास अथवा परिच्छेद २.४ मधील नमूद परिस्थिती उद्भवल्यास/झाली असल्यास, जिल्हाधिकारी यांनी त्याची नियुक्ती तात्काळ रद्द करावी व अशा दोष सिध्द झालेल्या व्यक्तिची नंतरच्या कालावधीत विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून कधीही नियुक्ती करु नये.

१०.२.२ निवृत्तीपासून एका वर्षानंतर करावयाच्या अर्जासंदर्भात :-

निवृत्तीपासून एका वर्षाच्या कालावधीनंतर विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्तीसाठी इच्छुक असलेल्या गट "अ" व गट "ब" (राजपत्रित) अधिकाऱ्यांनी जिल्हाधिकारी यांचेकडे अर्ज करावा (अर्जाचा नमुना **परिशिष्ट "१०"** प्रमाणे) व जिल्हाधिकारी यांनी पोलीसांमार्फत त्यांची चारित्र्य पडताळणी करुन त्यांचेविरुध्द फौजदारी गुन्हयांची नोंद नसल्यास त्यांची ५ वर्षासाठी विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५१२३११४४४२५७९०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pradeep Darade

Digitally signed by Pradeep Darade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Pradeep Darade
Date: 2016.01.14 16:23:07 +05'30'

**( प्र.ल.दराडे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**सोबत : परिशिष्टे "१" ते "१०"**

**प्रत,**

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३) सर्व मा.मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२,
४) मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई,
५) मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई,
६) मा.सभापतीचे सचिव, विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई,
७) मा.अध्यक्षांचे सचिव, विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई,
८) सर्व मा.विधानसभा/विधान परिषद व संसद सदस्य,
९) मा.मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२,
१०) सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
११) प्रधान सचिव (कामगार),उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१२) सचिव (सामाजिक न्याय), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय,मुंबई-३२.
१३) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई,
१४) सर्व विभागीय आयुक्त/सर्व जिल्हाधिकारी,
१५) आयुक्त, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, मुंबई,
१६) आयुक्त, राज्य माहिती आयोग (सर्व),
१७) सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई,
१८) पोलीस महासंचालक, मुंबई/सर्व पोलीस आयुक्त, महाराष्ट्र राज्य,
१९) सर्व जिल्हा पोलीस अधीक्षक,
२०) प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई/नागपूर/औरंगाबाद,
२१) राज्य महिला आयोग, मुंबई,
२२) भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ.बॅरेक नं.१, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईन्ट, मुंबई-२०,
२३) शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई-२८,

२४) इंडीयन नॅशनल काँग्रेस, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई-२५,
२५) राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईन्ट, मुंबई-२१,
२६) बहुजन समाज पार्टी, डी-१, इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई-१,
२७) भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभवन, एस.व्ही.पटेल रोड, मुंबई-४,
२८) भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई-१३,
२९) संचालक, शासकीय मुद्रणालय, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई,
३०) सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने/संग्रहासाठी,
३१) निवड नस्ती (कार्यासन-५).

**शासन निर्णय, सा.प्र.वि., क्र. विकाअ १११५/प्र.क्र.८८/५, दिनांक ३१ डिसेंबर, २०१५ सोबतची सहपत्रे.**

**परिशिष्ट - "१"**

विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्तीसाठी इच्छुक उमेदवाराने द्यावयाची माहिती

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण नांव | : |
| २. | टोपण नांव (असल्यास) | : |
| ३. | अ) वडीलांचे नांव | : |
| | ब) आईचे नाव | : |
| ४. | जन्मदिनांक व जन्मस्थान | : |
| ५. | विवाहित किंवा अविवाहित | : |
| | विवाहित असल्यास, पत्नी व मुलांची नावे | : |
| ६. | मूळ गावचा पत्ता | : |
| ७. | सध्याचा राहण्याचा पत्ता<br>मागील सलग १५ वर्षातील वास्तव्याची ठिकाणे<br>(पत्ता व कालावधीसह) | : |
| ८. | अ) राष्ट्रीयत्व | : |
| | ब ) आधार कार्ड नंबर (सोबत प्रत जोडावी ) | : |
| ९. | शैक्षणिक पात्रता (पुराव्याच्या प्रतीसह) | : |
| १०. | (अ) नोकरी | : |
| | (ब) कार्यालयाचा पत्ता व कार्यालयीन दूरध्वनी क्रमांक | : |
| ११. | व्यवसाय असल्यास, स्वरुप | : |
| १२. | (अ) संबंधित व्यक्तीविरुध्द फौजदारी गुन्हा/खटला<br>प्रलंबित आहे काय? | : |
| | (ब) गुन्हा/खटला प्रलंबित असल्यास,<br>त्याची सद्य:स्थिती व लावण्यात आलेली कलमे | : |
| | (क) खटला निकाली निघाला असल्यास,<br>त्याचा निर्णय व खटल्यात लावण्यात आलेली कलमे<br>(आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) | : |
| १३. | अर्जदाराच्या कुटुंबातील सदस्यांची विशेष कार्यकारी<br>अधिकारी म्हणून नियुक्ती झाली आहे काय ?<br>असल्यास, तपशील द्यावा. | : |

**प्रतिज्ञापत्र**

अ.क्र. १ ते १३ मध्ये मी दिलेली माहिती सत्य आहे व ती खोटी असल्यास मी कार्यवाहीस पात्र राहीन. माझ्या कुटुंबातील माझ्याशिवाय अन्य कुठल्याही व्यक्तीची, विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती केलेली नाही.

सही/-

दिनांक :- प्रपत्र भरुन सादर करणा-या व्यक्तीचे पूर्ण नांव

अनुक्रमांक १ ते १३ येथील माहिती तपासली असून ती बरोबर आहे.

ठिकाण **:**

सही व शिक्का

दिनांक : (संबंधित पोलीस निरीक्षक)

शासन निर्णय, सा.प्र.वि., क्र. विकाअ १११५/प्र.क्र.८८/५, दिनांक ३१ डिसेंबर, २०१५ सोबतची सहपत्रे

## परिशिष्ट "२"

### विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्त केलेल्या व्यक्तीसाठी ओळखपत्राचा नमुना

**महाराष्ट्र शासन**
Government of Maharashtra

**ओळखपत्र / Identity Card**

**विशेष कार्यकारी अधिकारी**
Special Executive Officer

वि.का.अ. यांचा पासपोर्ट साईज रंगीत फोटो

**( केवळ साक्षांकनासाठी )**
(ONLY FOR ATTESTATION)

जिल्हाधिकारी
यांची सही व शिक्का

नोंदणी क्र.

वैधता कालावधी : दि. ते दि.
Validity : to :

जिल्हा/District --------------
नांव :
पत्ता :
दूरध्वनी/भ्रमणध्वनी क्र :

५"(इंच)

---------------------३.५" (इंच)-------------------

टिप :- ओळखपत्र वरील विहित नमुन्याप्रमाणे असावे.
आकार - ५" X ३.५" (इंच)
रंग - सफेद ओळखपत्रावर निळया अक्षरांमध्ये.

शासन निर्णय, सा.प्र.वि., क्र. विकाअ १११५/प्र.क्र. ८८/५, दिनांक ३१ डिसेंबर, २०१५ सोबतची सहपत्रे

परिशिष्ट "३"

विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्तीबाबत जिल्हाधिकारी यांनी द्यावयाचे प्रमाणपत्र

## महाराष्ट्र शासन

Government of Maharashtra

### प्रमाणपत्र/Certificate

प्रमाणित करण्यात येत आहे की,

श्री./श्रीमती.----------------------------(नांव, शहर/तालुका) यांची

# विशेष कार्यकारी अधिकारी

## (SPECIAL EXECUTIVE OFFICER)

म्हणून दिनांक ते या

कालावधीसाठी साक्षांकनाच्या (attestation) कामासाठी नियुक्ती करण्यात येत आहे.

जिल्हाधिकारी यांची स्वाक्षरी

नोंदणी कमांक :

जिल्हा :

दिनांक :

८"(इंच)

५.५" (इंच)

टिप :- प्रमाणपत्र वरील विहित नमुन्याप्रमाणे असावे.

आकार :- ८" X ५.५" (इंच)

रंग :- सफेद प्रमाणपत्रावर निळया अक्षरांमध्ये.

**शासन निर्णय, सा.प्र.वि., क्र. विकाअ १११५/प्र.क्र.८८/५, दिनांक ३१ डिसेंबर, २०१५ सोबतची सहपत्रे**

## परिशिष्ट "४"

## विशेष कार्यकारी अधिकारी यांना मार्गदर्शक सूचना

१. विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून केलेली नियुक्ती "मानसेवी" असल्यामुळे विशेष कार्यकारी अधिकारी यांना कोणतेही मानधन/वेतन/भत्ते अनुज्ञेय असणार नाहीत.

२. विशेष कार्यकारी अधिकारी यांना केवळ कागदपत्रांच्या साक्षांकनाचे अधिकार राहतील व त्यांनी मूळ कागदपत्रे प्रत्यक्ष पाहिल्या शिवाय साक्षांकन करु नये. त्यांनी साक्षांकन करताना विहीत रबरी शिक्क्यासह सही करुन सहीखाली दिनांक नमूद करावा. मूळ कागदपत्रांपेक्षा वेगळी माहिती नमूद असलेल्या कागदपत्रांवर विशेष कार्यकारी अधिकारी यांनी साक्षांकन करू नये. वेगळी माहिती असलेल्या कागदपत्रांवर जर “सत्य प्रत” म्हणून साक्षांकन केल्यास त्यामुळे होणाऱ्या सर्व प्रकारच्या परिणामांकरिता “विशेष कार्यकारी अधिकारी” म्हणून साक्षांकन करणारी व्यक्ती जबाबदार राहील. अशी घटना उघडकीस आल्यास त्या व्यक्तीची विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून करण्यात आलेली नियुक्ती रद्द करण्यात येईल व तो/ती विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून पुनर्नियुक्तीस अपात्र असेल.

३. विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्त झालेल्या व्यक्तिंनी त्यांच्या घरावर/दुकानावर/ कार्यालयावर स्वत:च्या नावासह "विशेष कार्यकारी अधिकारी" असा फलक लावावा. तथापि त्यांनी त्यांच्या कुठल्याही वाहनावर “विशेष कार्यकारी अधिकारी" असा उल्लेख करु नये. तसेच त्यांच्या नियुक्तीचा कालावधी संपुष्टात आल्यावर लागलीच त्यांनी सदर फलक काढावेत.

४. विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्त झालेल्या व्यक्तींनी "ओळख परेड" तसेच "मृत्युपूर्व जबानी" यासाठी उपस्थित राहू नये.

५. विशेष कार्यकारी अधिकारी यांनी "उत्पन्न प्रमाणपत्र" देवू नये.

६. नियुक्तीचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर विशेष कार्यकारी अधिकारी यांनी सांक्षाकनाचे काम करु नये व सर्व साहित्य जिल्हाधिकारी यांचेकडे तात्काळ परत करावे. अन्यथा ते पुनर्नियुक्तीस अपात्र ठरतील. नियुक्ती कालावधी संपुष्टात आल्यानंतर विशेष कार्यकारी अधिकारी यांनी साक्षांकन केल्याचे निष्पन्न झाल्यास त्यांचेविरुध्द फसवणुकीचा गुन्हा नोंदविण्यात येईल.

७. विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती ही नियुक्तीच्या दिनांकापासून ५ वर्षे कालावधीसाठी राहील व त्यानंतर ती आपोआप संपुष्टात येईल. सदर नियुक्तीच्या कालावधीत त्यांनी कोणतीही नियमबाह्य कृती केल्यास किंवा त्यांचेविरुध्द गुन्हयाची नोंद आढळल्यास, त्यांना कोणत्याही न्यायालयाने नादार (bankrupt) जाहीर केले असल्यास, त्याचप्रमाणे कोणत्याही कारणाशिवाय सुध्दा, कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांची नियुक्ती मुदतपूर्व रद्द करण्यात येईल.

*****************

शासन निर्णय, सा.प्र.वि., क्र. विकाअ १११५/प्र.क्र.८८/५, दिनांक ३१ डिसेंबर, २०१५ सोबतची सहपत्रे

## परिशिष्ट "५"

### विशेष कार्यकारी अधिकारी यांनी साक्षांकनासाठी वापरावयाच्या रबरी शिक्क्याचा नमुना

**सत्य प्रत / TRUE COPY**

*सही/- व दिनांक*

नांव/Name......................जिल्हा/Dist.....................

विशेष कार्यकारी अधिकारी/Special Executive Officer

नोंदणी क्र./Registration No:

वैधता/Validity: to

३ (सें.मी.)

७ (सें.मी.)

टिप : रबरी शिक्का वरील विहीत नमुन्याप्रमाणे असावा.
आकार : ३X७ (सें.मी.)

**शासन निर्णय, सा.प्र.वि.,क्र. विकाअ १११५/प्र.क्र.८८/५, दिनांक ३१ डिसेंबर, २०१५ सोबतची सहपत्रे**

परिशिष्ट"६"

माजी विधान मंडळ सदस्य/संसद सदस्य यांनी जिल्हाधिकाऱ्यांना द्यावयाच्या विनंती पत्राचा नमुना

| | |
|---|---|
| माजी विधान मंडळ सदस्य/संसद सदस्याचे पूर्ण नांव | : |
| सदस्यत्वाचा कालावधी | : |
| जन्म दिनांक | : |
| सध्याचा राहण्याचा पत्ता | : |
| दूरध्वनी क्रमांक/भ्रमणध्वनी क्रमांक | : |

मी, , विधान मंडळाचा/ संसदेचा माजी सदस्य आहे. विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून माझी नियुक्ती होण्यास मी इच्छुक आहे.

ठिकाण : सही /-

दिनांक :

शासन निर्णय, सा.प्र.वि., क्र. विकाअ १११५/प्र.क्र.८८/५, दिनांक ३१ डिसेंबर, २०१५ सोबतची सहपत्रे

## परिशिष्ट "७"

### जनगणना २०११ नुसार विशेष कार्यकारी अधिकारी यांच्या नियुक्तीची जिल्हानिहाय कमाल मर्यादा

| अ.क्र. | जिल्हयाचे नांव | जनगणना २०११ नुसार लोकसंख्या | | | जनगणना २०११ च्या जिल्हानिहाय लोकसंख्येनुसार दर १००० लोकसंख्येस १ या प्रमाणे विशेष कार्यकारी अधिकारी यांची कमाल संख्या |
|---|---|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्रिया | एकूण | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १ | नंदुरबार | ८३४८६६ | ८११३११ | १६४६१७७ | १६४६ |
| २ | धुळे | १०५५६६९ | ९९३११२ | २०४८७८१ | २०४९ |
| ३ | जळगांव | २१९७८३५ | २०२६६०७ | ४२२४४४२ | ४२२४ |
| ४ | बुलढाणा | १३४२१५२ | १२४५८८७ | २५८८०३९ | २५८८ |
| ५ | अकोला | ९३६२२६ | ८८२३९१ | १८१८६१७ | १८१९ |
| ६ | वाशिम | ६२१२२८ | ५७५४८६ | ११९६७१४ | ११९७ |
| ७ | अमरावती | १४८२८४५ | १४०४९८१ | २८८७८२६ | २८८८ |
| ८ | वर्धा | ६६५९२५ | ६३०२३२ | १२९६१५७ | १२९६ |
| ९ | नागपूर | २३८८५५८ | २२६४६१३ | ४६५३१७१ | ४६५३ |
| १० | भंडारा | ६०४३७१ | ५९४४३९ | ११९८८१० | ११९९ |
| ११ | गोंदिया | ६६२५२४ | ६५९८०७ | १३२२३३१ | १३२२ |
| १२ | गडचिरोली | ५४२८१३ | ५२८९८२ | १०७१७९५ | १०७२ |
| १३ | चंद्रपूर | ११२०३१६ | १०७३९४६ | २१९४२६२ | २१९४ |
| १४ | यवतमाळ | १४२५५९३ | १३४९८६४ | २७७५४५७ | २७७५ |
| १५ | नांदेड | १७३२५६७ | १६२३९९९ | ३३५६५६६ | ३३५७ |
| १६ | हिंगोली | ६०९३८६ | ५६९५८७ | ११७८९७३ | ११७९ |
| १७ | परभणी | ९४६१८५ | ८८९७९७ | १८३५९८२ | १८३६ |
| १८ | जालना | १०१५११६ | ९४३३६७ | १९५८४८३ | १९५८ |
| १९ | औरंगाबाद | १९२८१५६ | १७६७७७२ | ३६९५९२८ | ३६९६ |
| २० | नाशिक | ३१६४२६१ | २९४४७९१ | ६१०९०५२ | ६१०९ |
| २१ | ठाणे | ४३३३६०८ | ३७३०४०७ | ८०६४०१५ | ८०६४ |
| २२ | पालघर | १५४५७७९ | १४४४३३७ | २९९०११६ | २९९० |
| २३ | मुंबई उपनगर | ५०२५१६५ | ४३०७३१६ | ९३३२४८१ | ९३३२ |
| २४ | मुंबई शहर | १७११६५० | १४३४३१६ | ३१४५९६६ | ३१४६ |
| २५ | रायगड | १३४८०८९ | १२८७३०५ | २६३५३९४ | २६३५ |
| २६ | पुणे | ४९३६३६२ | ४४९०५९७ | ९४२६९५९ | ९४२७ |
| २७ | अहमदनगर | २३४८८०२ | २१९४२८१ | ४५४३०८३ | ४५४३ |
| २८ | बीड | १३५२४६८ | १२३३४९४ | २५८५९६२ | २५८६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २९ | लातूर | १२७६२६२ | ११७९२८१ | २४५५५४३ | २४५६ |
| ३० | उस्मानाबाद | ८६४६७४ | ७९५६३७ | १६६०३११ | १६६० |
| ३१ | सोलापूर | २२३३७७८ | २०८१७४९ | ४३१५५२७ | ४३१६ |
| ३२ | सातारा | १५१२५२४ | १४९१३९८ | ३००३९२२ | ३००४ |
| ३३ | रत्नागिरी | ७५९७०३ | ८५२९६९ | १६१२६७२ | १६१३ |
| ३४ | सिंधुदुर्ग | ४१६६९५ | ४३२१७३ | ८४८८६८ | ८४९ |
| ३५ | कोल्हापूर | १९८३२७४ | १८९०७४१ | ३८७४०१५ | ३८७४ |
| ३६ | सांगली | १४३५९७२ | १३८४६०३ | २८२०५७५ | २८२१ |
| | एकूण | ५८३६१३९७ | ५४०११५७५ | ११२३७२९७२ | ११२३७३ |

**शासन निर्णय, सा.प्र.वि., क्र. विकाअ १११५/प्र.क्र.८८./५, दिनांक ३१ डिसेंबर, २०१५ सोबतची सहपत्रे**

**परिशिष्ट "८"**

**निवृत्तीनंतर एका वर्षाच्या आत विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्तीसाठी अर्ज करणाऱ्या निवृत्तीवेतन धारक राज्य शासकीय कर्मचाऱ्याने विभाग प्रमुखाकडे करावयाच्या अर्जाचा नमुना**

अर्जदाराचे नांव व पत्ता :

दूरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक :

दिनांक :

**प्रति,**

--------------**(विभाग प्रमुख),**

महोदय,

आपल्या पर्यवेक्षीय नियंत्रणाखालील ----------------------- (पदाचे नांव) या पदावरुन मी दिनांक --------- रोजी नियत वयोमानानुसार/स्वेच्छेने सेवानिवृत्त झालो/झाले आहे. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर यांच्या पीपीओ क्रमांक -------------, दिनांक----------- नुसार मला नियमित निवृत्तीवेतन मंजूर झालेले आहे (प्रत सोबत जोडली आहे). राज्य शासनाच्या सेवेतून निवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांना विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती देण्याबाबत शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.विकाअ-१११५/प्र.क्र. ८८/५, दि. ३१/१२/२०१५ अन्वये निर्णय घेण्यात आलेला आहे. त्यानुसार विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती होण्यासाठी मी इच्छुक असून, माझ्या नावाची शिफारस जिल्हाधिकारी यांचेकडे करावी, अशी विनंती आहे.

आपला ,

**अर्जदाराची स्वाक्षरी**

---------

**शासन निर्णय, सा.प्र.वि.,क्र. विकाअ १११५/प्र.क्र.८८/५, दिनांक ३१ डिसेंबर, २०१५ सोबतची सहपत्रे**

**परिशिष्ट "९"**

**निवृत्ती नंतर एका वर्षाच्या आत विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्तीसाठी अर्ज करणाऱ्या निवृत्तीवेतन धारक राज्य शासकीय कर्मचाऱ्याच्या संदर्भात विभाग प्रमुखाने जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठवावयाच्या शिफारस पत्राचा नमुना**

पत्राचा क्रमांक व दिनांक :
कार्यालयाचा पत्ता :
दिनांक :
दूरध्वनी क्रमांक :

श्री./श्रीमती.------------------------- रा.-------------- (अर्जदाराचा पूर्ण पत्ता व दूरध्वनी क्रमांक) हे /ह्या, या कार्यालयाच्या पर्यवेक्षीय नियंत्रणाखालील --------- या पदावर कार्यरत असताना दिनांक ---------- रोजी नियत वयोमानानुसार /स्वेच्छेने सेवानिवृत्त झालेले /झालेल्या आहेत. राज्य शासनाच्या सेवेतून निवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांना विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती देण्याबाबत शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. विकाअ-१११५/प्र.क्र.८८/५, दि.३१/१२/२०१५ अन्वये निर्णय घेण्यात आलेला आहे. या शासन निर्णयास अनुसरुन श्री/श्रीमती.---------- यांनी दिनांक -------- च्या अर्जान्वये विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती होण्यासाठी इच्छुकता दर्शविलेली आहे. उपरोक्त शासन निर्णयात स्पष्ट केल्यानुसार श्री./श्रीमती.---------------यांचा सेवा अभिलेख तपासला असता, सेवा कालावधीत त्यांचेविरुध्द फौजदारी किंवा विभागीय चौकशीची किंवा निलंबनाची कार्यवाही करण्यात आलेली नव्हती. म्हणून श्री./श्रीमती.----------------- यांची विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

सक्षम अधिकाऱ्याचे नाव, स्वाक्षरी व दिनांकासहीत शिक्का

**शासन निर्णय, सा.प्र.वि., क्र. विकाअ १११५/प्र.क्र.८८/५, दिनांक ३१ डिसेंबर, २०१५ सोबतची सहपत्रे**

**परिशिष्ट "१०"**

**निवृत्ती पासून एका वर्षानंतर विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्तीसाठी अर्ज करणाऱ्या निवृत्तीवेतन धारक राज्य शासकीय कर्मचाऱ्याने जिल्हाधिकारी यांच्याकडे करावयाच्या अर्जाचा नमुना**

अर्जदाराचे नांव व पत्ता :
दूरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक :
दिनांक :

**प्रति,**
**--------------(जिल्हाधिकारी),**

महोदय,

---------------(विभाग प्रमुखाचे पदनाम व विभागाचे नाव) या विभाग प्रमुखांच्या पर्यवेक्षीय नियंत्रणाखालील ------------- पदावर कार्यरत असताना दिनांक -------- रोजी मी नियत वयोमानानुसार/स्वेच्छेने सेवानिवृत्त झालो/झाले आहे. *{निवृतीच्या दिनांकास मी--------------(कार्यालयाचे नांव व पत्ता) या कार्यालयात ----------(प्रतिनियुक्तीवर असल्यास तसा स्पष्ट उल्लेख येथे करावा), कार्यरत होतो/होते}. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर यांच्या पीपीओ क्रमांक -------------, दिनांक ------------ अनुसार मला नियमित निवृत्ती वेतन मंजूर झाले असून ते मी नियमितपणे घेत आहे. राज्य शासनाच्या सेवेतून निवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांना विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती देण्याबाबत शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.विकाअ-१११५/प्र.क्र.८८/५, दि.३१/१२/२०१५ अन्वये निर्णय घेण्यात आलेला आहे. त्यानुसार विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती होण्यासाठी मी इच्छुक असून, विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून माझी नियुक्ती करण्यात यावी, ही विनंती.

आपला ,

**अर्जदाराची स्वाक्षरी**

-------

***टिप : { }............ आवश्यकता नसल्यास खोडावे.**